टिपणी दि. १८/६/२०१३

# पर्यटन स्थळ - वाफा

**वनक्षेत्र :- शहापूर** **वनविभाग शहापूर**

**भागदळ संयुक्त वन व्यवस्थापन समिती**

शहापूर वनविभागात शहापूर शहरानजिक १.५० कि.मी अंतरावर वाफा मध्यवर्ती रोपवाटीका सुमारे १२ हेक्टर क्षेत्रात स्थापन करण्यांत आलेले आहे. सदर रोपवाटीकेसाठी ३ हेक्टर क्षेत्र पुरेसे असून उर्वरीत क्षेत्रात सन २००८-०९ मध्ये पर्यटन स्थळ विकसीत करण्यांत आलेले आहे.

२. सदर पर्यटन स्थळांतर्गत अस्तिवात असलेले जुने गोडावून, लेबर शेड, कर्मचाऱ्यांचे निवासस्थान व मोडकळीस आलेल्या इमारतीची दुरुस्ती करुन त्यांचे रुपांतर वनविश्रामगृहामध्ये करण्यांत आलेले आहे. त्यामुळे सद्यपरिस्थितीत वनसंवर्धन १९८० चा भंग होऊ न देता आजमितीस १ लक्झरी सुट, दोन AC सुट, १ AC कुटी व १ डॉरमेंटरी उभारण्यांत आलेले आहे. तसेच पायडल नौका विहार, कृत्रिम धबधबा, बालोद्यान अशा प्रकारे पर्यटकांचे मनोरंजनासाठी सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यांत आलेले आहे.

३. सदर पर्यटन स्थळाचे देखभाल संयुक्त वन व्यवस्थापन समिती भागदळ यांचेमार्फत करण्यांत येत असून पर्यटकांना देण्यांत येणाऱ्या सोई सुविधा पासुन मिळणारे उत्पन्न समितीचे खात्यामध्ये जमा होत असते.

४. सन २००८-०९ मध्ये पर्यटन स्थळांचा विकास करणे या योजनेंतर्गत रक्कम रु. १७.५८ लाख अनुदान उपलब्ध झाले होते. सदर अनुदानातुन पॅगोडा उभारणे, वॉच टॉवर, अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती, जनरेट खरेदी, पॅडल बोट खरेदी, स्प्रिन्कलर सिस्टीम, बारवेल-१, इलेक्ट्रीक पंप खरेदी अशा प्रकारची कामे करण्यांत आली होती.

५. सन २००९-१० मध्ये वरील योजनेंतर्गत रक्कम रु. ११४.३३ लाख अनुदान उपलब्ध झाले होते. सदर अनुदानातुन मजुरकुटी, माहिती केंद्र, रस्ते दुरुस्ती, भांडार दुरुस्ती, मोटरबोट खरेदी, स्वच्छतागृह बांधणे, वृक्षाभोवती पार बांधणे, तंबु खरेदी अशा प्रकारची विविध कामे करण्यांत आली होती.

६. वाफा पर्यटन स्थळापासुन संयुक्त वनव्यवस्थापन समिती भागदळ यांना खालील प्रमाणे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | वर्ष | जमा रक्कम | खर्च रक्कम | निव्वळ उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | मे २०१० ते डिसें २०१० | २,१८,७१६ | १,५१,३३२ | ६७,३८४ |
| २ | जाने २०११ ते डिसे २०११ | ५,८६,०९९ | २,३०,८१४ | ३,५५,२८५ |
| ३ | जाने २०१२ ते डिसें २०१२ | ८,२५,६३३ | ३,६५,३६१ | ४,६०,२७२ |

पर्यटन स्थळांतर्गत विविध प्रकारची कामे करण्यांत आलेली असल्याने दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढीस लागलेली आहे.



**Bhatsa River**



**Dormitory**



**Karvi Hut**



**Pedal boat**



**Reception Hall**



**Water Fountain**